# जाहीर निवेदन

मुख्य अभियंता, महावितरण, परिमंडळ कार्यालय, नांदेड यांच्या आस्थापनेवर सन २०२३-२४ करिता **NATS** अंतर्गत विद्युत पदवि/ पदविका अभियांत्रिकी **(Designated Course)** या स्वतंत्र व्यवसायासाठी विद्युत पदवि/ पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवाराकडुन एक वर्ष कालावधी करिता शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी **(Electrical Engineering Degree/ Diploma)** विद्युत अभियांत्रिकी पदवि-१९ व पदविका-९ अशी एकूण २८ पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी दिनांक **१५.११.२०२३ (२४.००)** पर्यंत **https://nats.education.gov.in** या संकेत स्थळावर आस्थापना कोड **WMHNDS000006** वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत दिनांक **१५.११.२०२३ (२४.००)** नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांची निवड ही एकूण गुणाच्या टक्केवारी **(Merit)** नुसार मुळ जाहिरातीच्या अटी व शर्ती च्या अधिन राहून करण्यात येईल.

१. उमेदवार विद्युत पदवि/ पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम सन २०२० नंतरचा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराचे दिनांक १५.११.२०२३ अखेर किमान वय १८ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे.
३. सदर भरती करिता नांदेड, परभणी व हिंगोली जिल्हयातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात यईल. निवड करण्यात आलेल्या उमदेवारांना नांदेड परिमंडळ कार्यालय अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली मंडळांतर्गत वर्ग करण्यात येईल.
४. विद्यावेतन नियमाप्रमाणे मिळेल.
५. शिकाऊ उमेदवार यांनी पोर्टलवर रजिस्ट्रेशन करणे व ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे.
६. निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावर अथवा **NATS Portal** व्दारे पुढील कार्यवाही बाबत कळविण्यात येईल.
७. मुळ कागदपत्रे तपासणी वेळी काही तफावत अथवा माहिती चुकीची आढळल्यास उमेदवारांची निवड कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. **टीप -** भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे, नमुद पदे कमी-जास्त करण्याचे, भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवित आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

मुख्य अभियंता
महावितरण, नांदेड परिमंडळ, नांदेड

**PRO No. १३७ - ३१/१०/२०२३**